# ऑगस्ट २०२४ चे राशी भविष्य- श्रावण महिना - शुक्ल आणि कृष्ण पक्ष

**लेखक - अजय तनखीवाले**




**पार्श्वभूमी :** या महिन्यात बुध शुक्र जोडी सिंहेत असल्यामुळे, तुमच्यातल्या कवी आणि नटाला प्रोत्साहन देईल आणि तुम्ही कला क्षेत्रात नाव कमवाल. श्रावण मासात भारतीय स्वातंत्र दिन, पारसी नववर्षारंभ हे समारंभ होतील.

**उत्सव**: या महिन्यात नाग पंचमी, नारळी पौर्णिमा आणि रक्षा बंधनाचे सोहोळे होणार. महत्वाच्या तारखा: अमावस्या- ४ ऑगस्ट, पौर्णिमा– १९ ऑगस्ट.

२.०: महिन्यातील गोचर ग्रह व युती: १. मकरेत प्लुटो, २. कुंभेत शनि, ३. रवि कर्केत, ४. शुक्र, बुध सिंहेत, ५. गुरू, हर्षल, मंगल वृषभेत, ६. राहू, नेपच्यून मिनेत. ७. केतू कन्या राशीत आहे.

१.२ – ४ ऑगस्ट रोजी ची कुंडली व १९ ऑगस्ट ची कुंडली


| **४ ऑगस्टची कुंडली** | **१९ ऑगस्टची कुंडली** |
|---|---|
|  |  |








## २.०: भविष्य-चंद्र राशी प्रमाणे: (भारतीय पध्दती प्रमाणे वाचावे).

काही लोकांना नक्षत्र माहित असते. दक्षिण भारतात त्यास स्टार म्हणतात. चंद्र राशी बरोबर नक्षत्र आणि चरण दिले आहे. तर राशी आणि नक्षत्र या पैकी जे माहिती असेल तो भाग वाचावा.


| राशी | भविष्य |
|---|---|
| २. १ मेष राशी (Mesh):<br><br><br>अश्विनी, भरणी, कृत्तिका(१) | • *शनि -११वा, गुरु -२रा, राहू -१२वा (अनिष्ठ)*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>    • अनिष्ठ राहूमुळे  स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता आहे.<br>    • वृद्धांना दीर्घकालीन व्याधींचे त्रास होण्याची शक्यता आहे.<br>    • परंतु नेपचुन ग्रह आपत्तीन मधून मार्ग काढून वाचवेल.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>    • पूर्वार्धात व्यावसायिक प्रतिष्ठा वाढेल.<br>    • स्वतंत्र व्यावसायिकांचा उत्कर्ष होईल.<br>    • आपली बुद्धिमत्ता व आधुनिक तंत्रज्ञान वापरुन तुम्ही नोकरीत यश मिळवाल.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>    • या मासात विवाह योग आहे.<br>    • तरुण मंडळींना उत्तम स्थळ सांगून येईल.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>    • महत्वाच्या गुंतवणुकी होतील.<br>    • राजकारणी मंडळीं विरोध करतील. ते सांभाळावे.<br>    • शनि ग्रह दीर्घ कालीन वित्तीय व्यवस्था करवेल.<br>• *इ . कौटुंबिक*<br>    • उत्तरार्धात मुलांना कला क्षेत्रात भरघोष यश मिळेल.<br>• *फ . परदेश गमन*<br>    • तुमच्या कामाचा परदेशी गवगवा होईल. |
| २.२ वृषभ राशी (Vrishabha):<br><br><br>कृत्तिका(२,३,४), रोहिणी, मृग (१,२) | • *शनि -१० वा गुरु -१ला , राहू -११वा*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>    • मासारंभी शुभ घटना घडतील. उष्णतेचे थोडे त्रास होतील.<br>    • स्थूलपणामुळे होणारे विकार थोडे डोक वर काढतील.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>    • विशिष्ट महत्वाची कामे होतील. शनि ग्रहाची साथ मिळेल, उद्योग धंदा वाढवाल.<br>• *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे* |


| | |
|---|---|
| | ● उत्तरार्ध तरुणांना लाभदायक ठरेल, नाती जुळतील.<br>● *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>● पौर्णिमेनंतर शत्रु पासून सावध राहा. आपली बुद्धी वापरुन गुंतवणुकी करा.<br>● *इ . कौटुंबिक*<br>● घरात मोठे मंगलमय वातावरण असेल.<br>● गायन व इतर कलांचे कार्यक्रम घरात होतील.<br>● मुलांना मार्गदर्शनाची गरज भासेल.<br>● *फ . परदेश गमन*<br>● पौर्णिमेजवळ संमिश्र ग्रह योग परदेशी नेतील. |
| २.3 मिथुन राशी (Mithun):<br><br><br>मृग(३,४), आर्द्रा, पुनर्वसु(१,२,३) | ● *शनि -९वा, गुरु -१२वा (अनिष्ठ), राहू – १०वा*<br>● *अ. स्वास्थ्य*<br>● महिना छानच जाईल.<br>● उष्णतेचे विकार आणि ज्वर यांचा थोडा त्रास होईल.<br>● आधुनिक तंत्रज्ञानामुळे तब्येत लवकर सुधारेल.<br>● अनपेक्षित प्रवास घडू शकतो.<br>● *ब . नोकरी/धंदा*<br>● व्यवसाय आर्थिक कोंडी घालवेल, आणि वसुली होईल.<br>● आपली बुद्धिमत्ता वापरून गूढ प्रकरणातून मार्ग काढाल.<br>● *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>● घरात सुवार्ता येईल.<br>● *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>● आपली बुद्धी वापरुन गुंतवणुकी करा.<br>● *इ . कौटुंबिक*<br>● श्रावणात तुम्ही मातृचिंतन कराल.<br>● भावंडांबरोबर गायन कला करून त्यांच्या संगतीचा आनंद लुटाल.<br>● *फ . परदेश गमन*<br>● शिक्षक म्हणून परदेशी जाल. |
| २.४ कर्क राशी (Karka):<br><br><br>पुनर्वसु(४), पुष्य, आश्लेषा | ● *शनि – ८वा(अनिष्ठ), गुरु-११वा, राहू-९वा*<br>● *अ. स्वास्थ्य*<br>▪ शारीरिक वेदनायुक्त व्याधी तुम्हाला सतावतील.<br>● *ब . नोकरी/धंदा* |

| | |
|---|---|
| | ▪ उत्तम व्यावसायिक  घडामोडी होतील. सर्वांचे सहकार्य मिळेल. समाजात  प्रतिष्ठा वाढेल.<br>● *क.  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>▪ पौर्णिमेस अनपेक्षित घटनांमुळे जागरण होईल व तणाव वाढेल.<br>● *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>▪ शनि मंगळ केंद्र योगा मुळे महत्त्वाच्या कामात बेरंग होऊ शकतो.<br>▪ उत्तरार्धात मात्र उत्तम व्यावसायिक घडामोडी घडतील. मंगळामुळे मोठ्या गुंतवणुकी होतील. आपल्या गुरुला विचारून कठिण परिस्थितीतून मार्ग काढाल.<br>● *इ. कौटुंबिक*<br>▪ थोरा मोठ्यांचे सहकार्य मिळेल. भावंडांना थोडे समजून घ्या.<br>● *फ. परदेश गमन*<br>▪ परदेशी व्यापारासाठी  प्रवास कराल. अचानक  संधी लाभेल आणि परदेशी  जाल. |
| २. ५ सिंहराशी (Simha):<br><br><br>मघा, पूर्वा, उत्तरा(१) | ● *शनि – ७ वा, गुरु - १० वा , राहू – ८ वा (अनिष्ठ)*<br>● *अ. स्वास्थ्य*<br>▪ शुक्रामुळे स्वास्थ्य छानच राहील.<br>▪ मात्र सार्वजनिक जीवन सांभाळा. आपल्या  अंगी असलेल्या कलांमुळे प्रसिद्ध व्हाल.<br>● *ब. नोकरी/धंदा*<br>▪ उच्च प्रदर्शनात तुम्ही झगमगाट कराल.<br>▪ पौर्णिमे जवळ, तरुणांना छंद किंवा इतर उपक्रमातून यश आणि प्रसिद्धी मिळेल.<br>● *क.  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>▪ घरात वाद घालू नका, भांडणे टाळा.<br>▪ कदाचित स्त्रीचिंता होईल.<br>▪ उच्च शनि ग्रह असल्या मुळे तुम्ही एखाद्या शिक्षका सारखे शिस्तप्रिय आणि कडक वागता. जोडीदारास त्याचा त्रास होतो.<br>● *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>▪ दीर्घकालीन गुंतवणुकी करून सर्वांची शाबासकी मिळवाल.<br>● *इ. कौटुंबिक*<br>▪ या महिन्यात भावंडांशी उत्तम प्रकारे जुळून येतील.<br>● *फ. परदेश गमन* |

| | |
|---|---|
| | ▪ याची शक्यता कमी पण प्रयत्न करत रहा. |
| २. ६ कन्या राशी (Kanya):<br><br>उत्तरा(२,३,४), हस्त, चित्रा (१,२) | • *<u>शनि – ६ वा (अनिष्ठ) , गुरु -९ वा , राहू -७ वा</u>*<br><br>• *<u>अ. स्वास्थ्य</u>*<br>• ग्रहांचा प्रतियोगा मुळे तब्येत अस्वस्थ राहील. मात्र शुक्र बुध जोडी मुळे तुम्ही कठिण प्रसंग सहज पार कराल.<br>• *<u>ब . नोकरी/धंदा</u>*<br>• अनपेक्षित अडचणीतून बेजार करणारी परिस्थीती असणार आणि नोकरीत तणाव.<br>•<br>• *<u>क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे</u>*<br>    • जोडीदारासोबत सांभाळून वागून आपल्या बुद्धीने गैरसमज टाळाल.<br>    • घरात कार्य उरकतील.सर्वांना प्रसन्न हेवणारी सुवार्ता मिळेल.<br>    • आपली बुद्धी वापरून जोडीदाराबरोबर गैरसमज टाळा.<br>• *<u>ड . वित्त/ गुंतवणुकी</u>*<br>    • या महिन्यात पूर्वर्धक उत्तम गुंतवणुकी कराल. जमीन विकत घ्यायची शक्यता आहे. महत्त्वाच्या कामात शिस्तबद्ध नियोजन करा.<br>• *<u>इ . कौटुंबिक</u>*<br>    • मुलांना परीक्षा मध्ये भरघोस यश मिळेल.<br>• *<u>फ . परदेश गमन</u>*<br>    • परदेशी जायच्या सर्व संधी तुम्हाला उपलब्ध होतील.<br>    • आधुनिक तंत्रज्ञानाच्या  गुरु म्हणून परदेशी प्रसिद्ध व्हाल. |
| २.७ तूळ राशी (Tula):<br><br>चित्रा(३,४), स्वाती, विशाखा (१,२,३) | • *<u>शनि ५, वा,  गुरु ८ वा(अनिष्ठ) , राहू-६ वा (अनिष्ठ)</u>*<br>• *<u>अ. स्वास्थ्य</u>*<br>    • मंगळ गुरु युती मुळे जुन्या व्याधींचा उपद्रव होऊ शकतो तेंव्हा पथ्य पाळा. रुग्णालयात दाखल व्हावे लागलं तरी व्हा. दोन्ही अनिष्ठा स्थानातील ग्रह, गुरु आणि राहूची उपासना करावी लागेल.<br>• *<u>ब . नोकरी/धंदा</u>*<br>    • व्यावसायिक तेजी असणार, सरकारी माध्यमातून लाभ होईल.<br>• *<u>क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे</u>*<br>    • शुक्र बुध जोडी या काळात तुमच्या खाजगी जीवनात रंग भरेल<br>• *<u>ड . वित्त/ गुंतवणुकी</u>*<br>    • व्यावसायिक तेजी असणार. सरकारी माध्यमातून लाभ होईल.<br>• *<u>इ . कौटुंबिक</u>* |

| | |
|---|---|
| | ● या महिन्यात मुलं उत्तम कारवाया करून गणितात बक्षीस मिळवतील.<br>● <u>*फ. परदेश गमन*</u><br>● प्रयत्न चालू ठेवा. या नाही तर पुढच्या महिन्यात परदेशी जाल. |
| २. ८ वृश्चिक राशी (Vrishchika):<br><br><br>विशाखा(४), अनुराधा, ज्येष्ठा | ● <u>*शनि – ४ था, गुरु -७ वा, राहू -५ वा*</u><br>● <u>*अ. स्वास्थ्य*</u><br>● घातपात अपघातातून सावध रहा<br>● <u>*ब. नोकरी/धंदा*</u><br>● नोकरी भाग्योदयाची.<br>● व्यवसायिक भागीदारीचे प्रश्न सतावतील.<br>● तुमच्या अंगच्या कला बघून बरेच लोक भाराऊन जातील. मैत्री वाढेल.<br>● उत्तरार्धात तर प्रसिद्धी चा कळस गाठाल<br>● <u>*क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*</u><br>● रंगात भंग म्हणून मंगळ ग्रहा मुळे थोडी निराशा पदरी पडेल.<br>● <u>*ड. वित्त/ गुंतवणुकी*</u><br>● कायदेशीर प्रकरणातील त्रास होईल.<br>● वडिलोपार्जित घरातून मोठा फायदा होण्याची शक्यता आहे<br>● <u>*इ. कौटुंबिक*</u><br>● भाऊ बहिणी उत्तम साथ देतील.<br>● मुलं भरकटली किंवा वाममार्गी लागली तर त्यांना मदत करावी.<br>● <u>*फ. परदेश गमन*</u><br>● परदेशी प्रसिद्धी मिळेल व सत्कार होतील. |
| २. ९ धनू राशी(Dhanu):<br><br><br>मूळ, पूर्वाषाढा, उत्तराषाढा(१) | ● <u>*शनि – ३ रा, गुरु -,४ था , राहू -६ वा (अनिष्ठ)*</u><br>● <u>*अ. स्वास्थ्य*</u><br>● डॉक्टर म्हणतो ते ऐकायचच नाही असं केलं तर बरे कसे व्हाल?.<br>● सर्जरीला कबुल व्हा. लवकरच स्वास्थ्य सुधारेल.<br>● <u>*ब. नोकरी/धंदा*</u><br>● बुध शुक्र युती तरुणांना उत्तम फलदायी होईल. परदेशातील मित्रांकडून लाभ होईल.<br>● नोकरीत विशिष्ट नैतिक विजय संपादन कराल<br>● <u>*क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*</u><br>● घरगुती वाद विवादात पडू नका.<br>● <u>*ड. वित्त/ गुंतवणुकी*</u> |

| | |
|---|---|
| | ◦ व्यावसायिक प्रथम प्रतिष्ठा वाढेल<br>• *इ. कौटुंबिक*<br>◦ अमावस्या मातृ-पितृ चिंतेची.<br>◦ भावंडं साथ देतील.<br>• *फ. परदेश गमन*<br>◦ तुमच्या कला तुम्हास परदेशी नेतील. |
| २. १० मकर राशी (Makar):<br><br><br>उत्तराषाढा(२,३,४), श्रवण, धनिष्ठा(१,२) | • *शनि -२ रा, गुरु –५ वा, राहु -३ रा*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>◦ अन्नपाण्यातून संसर्गजन्य रोग लागण्याची शक्यता<br>◦ तुम्हाला तुमच्या कलांमुळे कठीण प्रसंग टाळता येतील.  पण आपला जीव जपून वागावे.<br>• *ब. नोकरी/धंदा*<br>◦ शनि ग्रह धंद्यात तेजी आणेल.<br>• *क.  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>◦ जोडीदार नाव कमावेल. त्यास बरीच प्रसिद्धी मिळेल.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>◦ पूर्वार्धात गुरुबळातून लाभ होईल आणि नुकसानी टळेल.  व्यवहारातून दगा फटके होतील. खरेदी विक्री सांभाळून करावी.<br>• *इ. कौटुंबिक*<br>◦ उत्तरार्धात मुलं धडाडीने पुढे जातील.<br>◦ भावंडात चढाओढ आणि अलिप्तता दिसेल.<br>• *फ. परदेश गमन*<br>◦ परदेश गमनाची बरीच शक्यता आहे, प्रयत्न चालू ठेवा. |
| २. ११ कुंभ राशी (Kumbha):<br><br><br>धनिष्ठा(३,४), शततारका, पूर्वाभाद्रपदा (१,२,३) | • *शनि – १ पहिला, गुरु – ४ था , राहू – २ रा*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>◦ ग्रह योगातून उच्च दाब राहील. अपवादात्मक प्रसंग यातून वाईट घटना घडू शकतात. पौर्णिमेजवळ आचारसंहिता पाळा.<br>• *ब. नोकरी/धंदा*<br>◦ नोकरीत भाग्योदय आहे पण थोडा समतोल साधा. स्पोटक विषय टाळा.<br>• *क.  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>◦ शुक्र ग्रहाचे भ्रमण सहकार्य देईल. |

| | |
|---|---|
| | ● जोडीदार नवविवाहिता सारखा वागेल. त्याच्या अंगच्या कलांच प्रदर्शन करून तुम्हास खुश करेल.<br>● *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>● मामलेदार कोर्ट तुमच्या वतीने निकाल देईल.<br>● *इ. कौटुंबिक*<br>● अमावस्ये आसपास, गाठी भेटीतून तुम्हाला मनस्ताप होईल.<br>● *फ. परदेश गमन*<br>● प्रवासाची शक्यता कमी आहे. |
| २.१२ मीन राशी (Meena):<br><br><br>पूर्वाभाद्रपदा (४), उत्तराभाद्रपदा, रेवती | ● *अ. शनि – १२, वा, गुरु - ३ रा , राहू -१ पहिला*<br>● *अ. स्वास्थ्य*<br>● ग्रहांच नैसर्गिक पाठबळ या महिन्यात कमी राहणार. अनपेक्षित अडचणींची भर पडेल.<br>● *ब. नोकरी/धंदा*<br>● सतत भांडखोर माणसे भेटतील मात्र मंगळ गुरु सहयोग स्वतंत्र व्यवसायिकांना विशिष्ट संधी देणारा असेल.<br>● *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>● जोडीदाराशी जास्त ताणून धरू नका. गैर समज टाळा.<br>● *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>● अमावस्ये जवळ जपून खरेदी करा.<br>● या महिन्यात उच्च दर्जाची जमीन खरेदी होइल.<br>● *इ. कौटुंबिक*<br>● शैक्षणिक समस्या सुटतील.<br>● कुटुंबातील एक तरी भाऊ वाद घालेल. त्याला थोडा वेळ द्यावा लागेल.<br>● *फ. परदेश गमन*<br>● विदेशातील व्यापारातून मोठा लाभ होईल. |